पुणे शहर पोलीस

# दर्पण

नोव्हेंबर २०१९

# अभिप्राय...

प्रति,

मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो.
शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर
यांना सविनय सादर

रिपोर्ट :- डी. एम. जाधव पो [illegible] शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर
यांजकडून विनंती पुर्वक की,

विषय :- दर्पण पुस्तिकाचे अभिप्रायबाबत

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, मा. पोलीस आयुक्त सो पुणे शहर यांनी पोलीस आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीची माहिती नागरिकांना समजावी या उद्देशाने पोलीस ठाणे येथे दैनंदिन कामकाज करीत असताना झालेल्या चांगल्या कामगिरीबाबतची प्रेस नोट जनसंपर्क अधिकारी पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर यांचे कार्यालयात सादर करण्याबाबत दिलेल्या आदेशाप्रमाणे पोलीस ठाणे येथे आठवडा भरामध्ये झालेल्या चांगल्या कामगिरीची प्रेस नोट सादर करण्यात येत असुन सदरची प्रेस नोट ही वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यानंतर सदरचे पेपर कात्रणाची कटिंग करुन त्यापासुन दर्पण हे पुस्तक तयार करण्यात आलेले आहे. सदरचे पुस्तक हे ठाणे अंमलदार कक्षामध्ये ठेवण्यात येत असुन पोलीस ठाणे येथे येणारे नागरिकांना सदरचे पुस्तक वाचण्यासाठी देण्यात येत असते.

दर्पण या पुस्तकामुळे पोलीस आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीची माहिती एकत्रित पणे वाचण्यासाठी उपलब्ध झालेली असुन दर्पण पुस्तक वाचल्यानंतर नागरिक हे पोलीसांचे चांगल्या कामाचे कौतुक करीत असुन नागरिकांचे मनामध्ये पोलीसांविषयी एक चांगल्या प्रकारची भावना निर्माण झालेली आहे. तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेही मनोबल वाढलेले असुन ते ही चांगली कामगिरी करुन आपले नाव व फोटो वर्तमान पत्रामध्ये येवुन त्याचे कात्रण दर्पण पुस्तिकामध्ये समाविष्ट होणेसाठी चांगली कामगिरी करण्याचे प्रयत्न करीत आहेत.

मा. सादर व्हावे
दि. [illegible]

(डी.एम.जाधव)
पोलीस हवालदार [illegible]
शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर

---

**प्रति,**

मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो,
वारजे माळवाडी पोलीस स्टेशन पुणे.
यांना सविनय सादर......

**प्रतिवेदक** :- संग्रमा एस.केंद्रे पो.शि.८७१७,
वारजे माळवाडी पोलीस स्टेशन पुणे.

**विषय** :- दर्पण या मासिकाबाबत आभिप्राय सादर केलेबाबत.

**महोदय,**

उपरोक्त विषयास सविनय सादर की, आम्हास दर्पण या मासिकाबाबत आभिप्राय मागवला असता त्याबाबत आमचा आभिप्राय असा की, सदरक्षणाय खलनिग्रहणाय या म्हणीप्रमाणे पोलीसांच्या कार्याचे प्रतिबिंब हे दर्पणामधून दिसत असल्याने पोलीसा विषयी कार्याचा गौरव समाजात होत असल्याने पोलीसांविषयी समाजात चांगली स्वच्छ प्रतिमा तयार होणेसाठी दर्पणच्या माध्यमातुन पोलीसांच्या कार्यांचा गौरव समाजापर्यंत पोहचण्याचे एक चांगले माध्यम आहे. पोलीस आधिकारी व पोलीस कर्मचारी हे आपले कर्याचे प्रतिबिंब समाजात दिसावे म्हणून पोलीस बांधवाची आधिक काम करण्याची धडपड चालू आहे.

दर्पण या मासिकामुळे पुणे शहर पोलीस दलातील सर्व पोलीस आधीकारी व कर्मचारी यांनी केलेल्या कामगीरीची प्रसिध्दी या माध्यमातुन स्थानिक नागरीकापर्यंत पोहचू लागली. त्यामुळे पोलीसांनी केलेल्या उत्कष्ठ कामगीरी लोकांच्या माध्यमातुन स्वागत करु लागले. पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस स्टेशन कडील उत्तम कामगीरीबाबत ज्या पोलीस स्टेशनची प्रसिध्दी झाली त्यावेळी इतर पोलीस स्टेशनकडील आधिकारी व कर्मचारी यांची भावना आपले पण पोलीस स्टेशनचे नाव या कामगीरीबाबत यायला पाहिजे पोलीस स्टेशनचे नाव लौकीक व्हावे म्हणून पोलीस आधिकारी व कर्मचारी यांचेमध्ये उत्तम कामगीर करण्याची स्पर्धा होवू लागली. त्यामुळे हाद्दीमध्ये पेट्रोलींग,गोपीनिय माहिती ,तडीपार आरोपी व इतरी स्वरुपाची गोपीनिय माहिती काढून त्यामध्ये आरोपी यांचेवर कडक कारवाई होवू लागल्याने आरोपी यांचेवर वचक बसल्याने गुन्हयाचे प्रमाण कमी होवू लागले.

दर्पणामध्ये आमचे कार्याचे प्रतिबिंब उमट असल्याने आम्हाला दर्पणाचा सार्थ अभिमान आहे.पोलीस प्रशासनाचे स्वच्छ व समाजाभिमुख कार्य या दर्पणामधुन समाजासमोर येत असल्याने समाजात पोलीस प्रशासनाच्या कार्याचा व विश्वसनियतेचा आलेख वाढत आहे. याबरोबरच समाजातील समाजविघातक शक्तीवर वचक बसत आहे. तसेच दर्पणामुळे पोलीसांविषयी समाजात स्वच्छ व चांगली प्रतिमा होणेसाठी मदत होत आहे.

(सग्रमा एस.केंद्रे)
पोलीस कॉन्स्टेबल
वारजे माळवाडी पोलीस स्टेशन पुणे.

# समुपदेशन
# व सामाजिक बांधीलकी

सकाळ – दि. २ नोव्हेंबर, २०१९

# छायाचित्रणासाठी संवेदनशील मन आवश्यक

## के. वेंकटेशम यांचे प्रतिपादन; 'कलाधिपती'चे कोथरूडमध्ये उद्घाटन

**पुणे, ता. १ :** छायाचित्रणासाठी मनात संवेदनशीलता असणे आवश्यक आहे. या संवेदनशीलतेला कलात्मकतेची जोड मिळाल्यास छायाचित्र जिवंत होते, असे मत पुण्याचे पोलिस आयुक्त के. वेंकटेशम यांनी येथे व्यक्त केले.

यशवंतराव चव्हाण नाट्यमंदिराच्या कलादालनात आयोजित करण्यात आलेल्या 'कलाधिपती' या छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन वेंकटेशम यांच्या हस्ते झाले, या वेळी ते बोलत होते. ढोल-ताशा महासंघाचे अध्यक्ष पराग ठाकूर, कसबा गणपती सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत शेटे, गुरुजी तालीम सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष विवेक खटावकर, तांबडी जोगेश्वरी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ अध्यक्ष राजाभाऊ टिकार, अदिती देवधर आदी



कोथरूड : येथील यशवंतराव चव्हाण नाट्यमंदिराच्या कलादालनात आयोजित प्रदर्शनातील छायाचित्रे पाहताना पोलिस आयुक्त के. वेंकटेशम.

उपस्थित होते. देशभरातील सुमारे २५ छायाचित्रकारांनी काढलेल्या शंभर छायाचित्रांचा समावेश या प्रदर्शनामध्ये करण्यात आला आहे. चौसष्ट कलांचा अधिपती असलेल्या गणेशाची विविध रूपे या प्रदर्शनात पाहता येणार आहेत. गणेशोत्सवाची पूर्वतयारी, दहा दिवसीय गणेशोत्सव, त्यानंतरची स्थिती अशा विविध छायाचित्रांचाही यात समावेश आहे. हे प्रदर्शन तीन नोव्हेंबरपर्यंत खुले राहणार आहे.

"आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात स्मार्टफोनमुळे हौशी छायाचित्रकारांना नवे पर्याय उपलब्ध झाले आहेत. मुंबईमध्ये असताना वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेली गणेशोत्सवातील अनेक चांगली छायाचित्रे आजही आपण जपून ठेवली आहेत. छायाचित्रकारांनी आपली ही आवड जपावी," असे वेंकटेशम यांनी सांगितले.

ठाकूर म्हणाले, की युवकांमध्ये असलेल्या ऊर्जेला चांगली दिशा देण्याचे काम गणेशोत्सवाच्या निमित्ताने करण्यात येते. पथकाच्या संस्कृतीमुळे आपल्या अनेक परंपरा टिकून आहेत. यावर्षीपासून आपल्या लाडक्या बाप्पाबरोबरचे अनेक क्षण छायाचित्रकार जिवंत करत असतात.

राज लोखंडे यांनी प्रास्ताविक केले. प्रणव तावरे यांनी आभार मानले.

सकाळ – दि. २२ नोव्हेंबर, २०१९



गुरुवार पेठ : विद्यार्थ्यांसोबत पोलिस राहुल खंडागळे व ज्योती मानकर.

# बालकांचे हक्क विषयावर मार्गदर्शन

पुणे, ता. २१ : गुरुवार पेठेतील केशवराव जेधे महापालिकेच्या शाळा क्र.१६ बीमध्ये 'बालकांचे हक्क व सुरक्षितता' याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी खडक माळ पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक राहुल खंडागळे तसेच पोलिस हवालदार सचिन माळी, अर्पण गजबे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन मुख्याध्यापिका ज्योती मानकर, उपशिक्षिका सुनंदा देवकर, संगीता कुलकर्णी यांनी केले होते.

पुण्यनगरी – दि. १२ नोव्हेंबर, २०१९

# शनिवार पेठ पोलीस चौकीत शांतता बैठक संपन्न



**पुणे** : रामजन्मभूमी निकालानंतर नागरिकांनी शांतता राखली. हिंदू-मुस्लीम बांधवांनी सलोखा राखला. अफवांवर कोणीही विश्वास ठेवला नाही, ही कौतुकास्पद बाब आहे, असे विश्रामबाग पोलीस स्टेशनअंतर्गत शनिवार पेठ पोलीस उपनिरीक्षक दीपक जाधव यांनी सांगितले. रामजन्मभूमी निकाल लागल्यानंतर शांतता व मोहल्ला कमिटीची बैठक झाली. याप्रसंगी राम दहाड, अजिज काझी, महेश गायकवाड, गणेश पांडे आणि हिंदू-मुस्लीम समाजाचे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोलीस हवालदार मतकर यांनी आभार मानले. मिटिंग यशस्वी करण्यासाठी महिला बिट मार्शल पोलीस शिपाई फंड, सरोदे यांनी विशेष परिश्रम घेतले.

**प्रभात** – दि. २० नोव्हेंबर, २०१९



**लोहगाव :** श्री संत तुकाराम उच्च माध्यमिक विद्यालयात बालकांचे हक्क व संरक्षण या विषयावर पोलीस उपनिरीक्षक हणमंत गिरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## सायबर गुन्ह्यांमध्ये युवकांचे प्रमाण जास्त ही चिंताजनक बाब - हणमंत गिरी

**विश्रांतवाडी** - सायबर गुन्ह्यांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. यामध्ये युवकांचे प्रमाण जास्त आहे. ही चिंताजनक बाब असल्याचे प्रतिपादन लोहगावचे पोलीस उपनिरीक्षक हणमंत गिरी यांनी केले. लोहगाव येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या श्री संत तुकाराम उच्च माध्यमिक विद्यालयात बालकांचे हक्क व संरक्षण या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य सुनील लाडके होते. यावेळी शांताराम खांदवे, सुभाष काळभोर, केंद्रप्रमुख ससाणे, विभाग प्रमुख प्रा. संजय राऊत, प्रा. संजय थोरवे, जि. प. प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक एस. डी. रत्नपारखी, पोलीस नाईक किरण पडवळ आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य सुनील लाडके यांनी सांगितले की, ध्येय निश्चित करून त्या दिशेने वाटचाल केल्यास हमखास यश मिळते. त्यासाठी कठोर परिश्रम, जिद्द, सातत्य व सहनशीलता या गोष्टींची तयारी ठेवण्याचे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एन. बी. मुल्ला यांनी केले.

**पुढारी** – दि. २० नोव्हेंबर, २०१९



कार्यक्रमात बोलताना पोलिस उपनिरीक्षक हणमंत गिरी.

## सायबर गुन्ह्यांमध्ये युवकांचे प्रमाण जास्त : गिरी

**येरवडा : वार्ताहर**

सायबर गुन्ह्यांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून, यामध्ये युवकांचे प्रमाण जास्त आहे, ही चिंताजनक बाब असल्याचे प्रतिपादन लोहगावचे पोलिस उपनिरीक्षक हणमंत गिरी यांनी केले.

लोहगाव येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या श्री संत तुकाराम उच्च माध्यमिक विद्यालयात 'बालकांचे हक्क व संरक्षण' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य सुनील लाडके होते. गिरी म्हणाले, बँकेचे अधिकारी कधीही बँक खाते व एटीएमची माहिती ग्राहकाला विचारत नाहीत. त्यामुळे बँकेचा अधिकारी बोलतोय म्हणून फोन करून आपल्या बँक खात्याविषयी अथवा एटीएम कार्डविषयी माहिती विचारल्यास अशा व्यक्तींना कोणताही प्रतिसाद देऊ नका व तेथेच सावध राहा, असेही सांगितले. कोणत्याही आमिषाला बळी न पडता गुन्हेगारी प्रवृत्तीविरुद्ध आवाज उठविण्याचे आवाहनही त्यांनी केले. प्राचार्य सुनील लाडके म्हणाले, ध्येयनिश्चित करून त्या दिशेने वाटचाल केल्यास हमखास यश मिळते.

या कार्यक्रमास शांताराम खांदवे, सुभाष काळभोर, केंद्रप्रमुख ससाणे, विभागप्रमुख प्रा. संजय राऊत, प्रा. संजय थोरवे, जि. प. प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक एस. डी. रत्नपारखी, पोलिस नाईक किरण पडवळ आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एन. बी. मुल्ला यांनी केले.

**लोकमत** – दि. १७ नोव्हेंबर, २०१९



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना राजेश पुराणिक.

# विद्यार्थ्यांनी घेतले रस्ता सुरक्षेचे धडे

लोकमत न्यूज नेटवर्क

**वानवडी :** वाहनचालकांनी शिस्त न पाळणे, नियम तोडणे याचे प्रमाण वाढलेले आहे. याचा परिणाम असा होतो, की अपघातांचे प्रमाण अधिक वाढलेले आहे. त्यामुळे वाहनचालकांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे, स्वयंशिस्तीकडे लक्ष दिल्यास अपघातांचे प्रमाण निश्चितपणे कमी होऊ शकते, असे मत समुपदेशक कक्ष- वाहतूक शाखा, पुणे शहरचे पोलीस निरीक्षक राजेश पुराणिक यांनी व्यक्त केले.

वानवडीतील विठ्ठलराव शिवरकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत जागृतीचा कार्यक्रम घेण्यात आला, त्या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना राजेश पुराणिक बोलत होते. या वेळी सहायक पोलीस फौजदार बी. बी. शिंदे, पोलीस हवालदार राजू पाटील, पोलीस नाईक ए. पी. हुले, पोलीस कॉन्स्टेबल वाय. एन. मांढरे उपस्थित होते.

- या वेळी रस्ते अपघातामध्ये मृत्यूचे प्रमाण अधिक होत आहे. अपघातानंतरचा एक तास व्यक्तीसाठी मदत मिळून जीव वाचण्यास उपयुक्त असतो. परंतु, लोक अपघातग्रस्तांना मदत करण्यास घाबरतात. यामुळे अनेकांना आपले प्राण गमवावे लागतात. परंतु आता सुप्रीम कोर्टाने अशा या मदत करणाऱ्या व्यक्तीस कायदेशीर संरक्षण देण्याच्या मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. मदत करणाऱ्या व्यक्तीस पोलीस, हॉस्पिटल, न्यायालय, अतिदक्षता सेवा अथवा अन्य विभागामार्फत कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही, अशी माहिती या वेळी देण्यात आली. पोलीस आयुक्त के. व्यंकटेशम व पोलीस उपायुक्त पंकज देशमुख यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले.

प्राचार्य लहू वाघुले यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला.

**महाराष्ट्र टाइम्स** – दि. २० नोव्हेंबर, २०१९



अहिल्यादेवी शाळेत बालकांच्या हक्कांबाबत मार्गदर्शन करताना पोलिस अधिकारी.

# बालक हक्कांवर मार्गदर्शन

**पुणे :** अहिल्यादेवी हायस्कूलमध्ये बालदिनानिमित्त बालकांचे हक्क आणि सुरक्षितता सप्ताहानिमित्त जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी मुख्याध्यापिका स्नेहल कुलकर्णी यांनी मुलांना मार्गदर्शन केले. पोलिस निरीक्षक शिल्पा चव्हाण यांनी मुलींशी संवाद साधला; तसेच 'समग्र अभियाना'चे चारुदत्त नेवासकर, पोलिस निरीक्षक क्रांती पवार यांनीही मुलींना मार्गदर्शन केले. अद्वैता उमराणीकर यांनी परिचय करून दिला. शिल्पकला रंधवे, समग्र अभियान प्रकल्प अधिकारी व रोहिणी शेलार आदी या वेळी उपस्थित होते.

महाराष्ट्र टाइम्स – दि. २७ नोव्हेंबर, २०१९

# विद्यार्थ्यांनी घेतले वाहतूक नियमांचे धडे

म. टा. प्रतिनिधी, येरवडा

**कल्याणीनगर येथील नगरवाला स्कूलमधील विद्यार्थ्यांनी वाहतुकीच्या नियमांचे शिक्षण घेतले. वाहतुकीचे नियम मोडल्याने होणारे अपघात, दंड याबाबत वाहतूक पोलिसांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शाळेत असतानाच वाहतुकीच्या नियमांची माहिती मिळाल्यास भविष्यात होणाऱ्या अपघातांना नक्काच आळा बसेल, असे सांगत वाहतूक पोलिसांनी विद्यार्थ्यांची तीस गुणांची लेखी परीक्षाही घेतली.**

वाहतुकीचा दिवा लाल असतानाही सिग्नल तोडणे, चुकीच्या दिशेने वाहन चालविणे, झेब्रा क्रॉसिंगवर वाहन थांबविणे, इंडिकेटर न देता वळणे अशा पद्धतीने अनेक जण वाहतुकीचे नियम तोडतात. वाहनचालकांकडून नियम धाब्यावर बसवल्याने चालकाला दंड भरावा लागतो किंवा अपघाताला सामोरे जावे लागते. यामुळे वाहतूक विभागाकडून वेळोवेळी जनजागृती अभियान राबविले जाते. या पार्श्वभूमीवर येरवडा वाहतूक विभागाने कल्याणीनगरमधील नगरवाला स्कूलमध्ये मंगळवारी व्याख्यान आयोजित केले होते. यामध्ये आठवी, नववी आणि दहावीचे साडेचारशे विद्यार्थी सहभागी झाले होते. रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत येरवडा वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक रमेश साठे यांनी मुलांना वाहतुकीच्या नियमांची माहिती दिली. सुमारे अर्धा तास व्याख्यान दिल्यानंतर विद्यार्थ्यांनी किती वाहतुकीचे नियम आत्मसात केले हे पाहण्यासाठी त्यांची तीस गुणांची लेखी परीक्षाही घेण्यात आली.

संदीप भातकर



वाहतूक पोलिसांनी विद्यार्थ्यांची लेखी परीक्षाही घेतली.

> **शाळेत असतानाच मुलांना वाहतूक आणि वाहतुकीच्या नियमांची जाण झाल्यास भविष्यात नक्कीच उपयोग होईल. मुलांसोबत प्रवास करताना पालक वाहतुकीचे नियम मोडत असल्यास त्यांना मुले नियम न मोडण्याची सूचना करतील.**
>
> – रमेश साठे, पोलिस निरीक्षक, येरवडा वाहतूक विभाग

सकाळ – दि. ४ नोव्हेंबर, २०१९

# सिंहगड पोलिस ठाण्यात दीपोत्सव उत्साहात साजरा



पुणे, ता. ३ : सण, उत्सव आनंदात साजरे करता यावेत, यासाठी पोलिस प्रशासन, अग्निशामक दल, स्वच्छता कर्मचारी अहोरात्र कर्तव्य बजावत असतात. कर्तव्यावर असलेल्या पोलिस बांधवाना दिवाळी सणाचा आनंद देण्यासाठी वंदेमातरम संघटनेचे युवा वाद्य पथक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संघर्ष समितीच्या वतीने दीपोत्सव साजरा करण्यात आला.

पोलिस बांधवानी प्रज्वलित केलेल्या शेकडो पणत्यांनी आणि रांगोळ्यांनी सिंहगड पोलिस ठाण्याचा परिसर उजळून निघाला. या वेळी पोलिस निरीक्षक नंदकुमार शेळके, युवा वाद्य पथकाचे अनिष पाडेकर, समितीचे संस्थापक अध्यक्ष शशिकांत कांबळे, अभिजित बोरा, विकास कांबळे, सागर पानसरे आदी उपस्थित होते. आपल्या सुरक्षिततेसाठी अहोरात्र सेवा देणाऱ्या पोलिस बांधवांप्रती कृतज्ञता म्हणून दरवर्षी दिवाळी पाडव्याच्या निमित्ताने दीपोत्सव साजरा करतो.

यंदा सनसिटी पोलिस स्टेशन सिंहगड रस्ता येथे हा दीपोत्सव साजरा करण्यात आला. अशा उपक्रमामुळे पोलिस बांधवांना कर्तव्यावर असूनही दिवाळी साजरी केल्याचा आनंद मिळतो, त्याचे आम्हाला समाधान असल्याचे शशिकांत कांबळे यांनी नमूद केले.

लोकमत – दि. २ नोव्हेंबर, २०१९

# पोलीस बांधवांसमवेत दीपोत्सव

पुणे : आपल्याला सण, उत्सव आनंदात साजरे करता यावेत, यासाठी पोलीस प्रशासन, अग्निशमन दल, स्वच्छता कर्मचारी अहोरात्र कर्तव्य बजावत असतात. पोलीस बांधवाना दिवाळी सणाचा आनंद देण्यासाठी वंदेमातरम संघटनेचे युवा वाद्य पथक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संघर्ष समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दीपोत्सव साजरा करण्यात आला. पोलीस बांधवानी प्रज्वलित केलेल्या शेकडो पणत्यांनी आणि रांगोळ्यांनी सिंहगड पोलीस स्टेशनचा परिसर उजळून निघाला. सिंहगड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नंदकुमार शेळके, उपनिरीक्षक कणसे यांच्यासह युवा वाद्य पथकाचे अनिष पाडेकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष शशिकांत कांबळे, अभिजित बोरा, विकास कांबळे, सागर पानसरे आदी उपस्थित होते. आपल्या सुरक्षिततेसाठी अहोरात्र सेवा देणा-या पोलीस बांधवांप्रती कृतज्ञता म्हणून दर वर्षी दिवाळी पाडव्याच्या निमित्ताने दीपोत्सव साजरा केला जातो. यंदा सनसिटी पोलीस स्टेशन, सिंहगड रोड येथे हा दीपोत्सव साजरा करण्यात आला.

पुण्यनगरी – दि.२३ नोव्हेंबर, २०१९

# पोलिसांनी कुटुंबासाठीही वेळ द्यावा : सिंधुताई सपकाळ



■ पुणे : एखाद्या गोष्टीच्या पाठीमागे किती धावायचे यालाही काही मर्यादा आहे. पोलीस खात्यात नोकरी करीत असताना धावपळीत काम करत असताना स्वतः आणि कुटुंबासाठीही वेळ दिला पाहिजे. महिलांच्या अनेक समस्या आहेत, त्या समजून घेऊन त्यांना योग्य न्याय देण्यासाठी पोलीस कार्यरत आहेत. कोणावरही अन्याय होणार नाही, दोन्ही बाजूंची शहानिशा करूनच निर्णय घेणे योग्य ठरेल, असे मत अनाथांची माय सिंधुताई सपकाळ यांनी व्यक्त केले.

हडपसर पोलीस स्टेशनमध्ये सिंधुताई सपकाळ यांनी भेट दिली. याप्रसंगी वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव, पोलीस निरीक्षक हमराज कुंभार, सहायक पोलीस निरीक्षक दिलीप गाडे, पोलीस उपनिरीक्षक राजश्री पाटील आणि अधिकारी-कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी त्या म्हणाल्या की, रघुनाथ जाधव हा माझा मुलगा आहे. मी पोलीस स्टेशनसमोरून जात होते, त्यावेळी पोलीस स्टेशनला असल्याचे समजले. त्यांनी चालकाला सांगून कार थांबवली आणि हडपसर पोलीस स्टेशनमध्ये जाऊन भेट घेत हितगुज साधले. यावेळी जाधव आणि कुंभार यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. जाधव म्हणाले की, समाजाचे स्वास्थ्य चांगले राहावे, यासाठी पोलीस कार्यरत आहेत. सामान्यांना आधार वाटेल, अशीच कामगिरी पोलिसांकडून केली जात आहे. पीडितांची अडवणूक कोणी करीत असेल, तर त्याच्यावर पोलिसांकडून कडक कारवाई केली जात आहे, ही भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले.

# निकालानंतर नागरिकांनी सलोखा राखावा

## 'अयोध्या' खटल्याच्या पार्श्वभूमीवर पोलिस उपायुक्तांचे आवाहन

म. टा. प्रतिनिधी, कात्रज

'काही दिवसांतच अयोध्या राम मंदिर, बाबरी मशीद याविषयी सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येणार आहे. हा निकाल कधीही येईल आणि तो काय आहे हे माहिती नाही. त्यामुळे निकाल काहीही लागला तरी सर्व धर्म, जातीच्या नागरिकांनी जातीय सलोखा राखावा. नागरिकांनी कोणतेही प्रक्षोभक वक्तव्य किंवा मेसेज पाठवू नयेत, काही चुकीचे संदेश दिले जात असल्याचे आढळल्यास त्याची माहिती पोलिसांना द्या,' असे आवाहन पुणे शहर पोलिस परिमंडळ-२चे उपायुक्त शिरीष सरदेशपांडे यांनी केले.

या बैठकीचे आयोजन भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक वसंत कुवर तसेच पोलिस निरीक्षक विष्णु ताम्हाणे यांनी केले होते. या वेळी शांतता कमिटीचे सदस्य, तसेच ज्येष्ठ नागरिक संघटनेचे पदाधिकारी आणि पोलिस अधिकारी उपस्थित होते.



भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात पोलिस उपायुक्त शिरीष सरदेशपांडे यांच्या उपस्थितीत 'अयोध्या' निकालाच्या पार्श्वभूमीवर शांतता सुव्यवस्था कायम राहावी यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती.

उपायुक्त सरदेशपांडे म्हणाले, 'सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल नागरिकांनी स्वीकारणे बंधनकारक आहे. निकालानंतर चांगल्या अथवा वाईट प्रतिक्रिया व्हॉट्स अॅप, फेसबुक अथवा इतर सोशल मीडियाद्वारे देऊ नयेत. कोणत्याही प्रकारे प्रक्षोभक वक्तव्य आणि पत्रकबाजी अथवा टीका करू नये. सोशल मीडियावर संबंधित निकालाच्या अनुषंगाने कोणत्याही धर्मांच्या भावना दुखावतील असा प्रकारचे संदेश प्रसारित करू नयेत.' 'निकालानंतर गुलाल उधळणे, फटाके वाजवणे, महाआरती अथवा समूहपठनाचे आयोजन करू नये. निकालानिमित्त पेढे, साखर अथवा मिठाई वाटणे, घोषणाबाजी करणे टाळावे. कोणत्याही जातिसमूहाच्या धार्मिक भावना दुखावण्याचा प्रयत्न झाल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल,' असेही त्यांनी स्पष्ट केले. शांतता राखण्यासाठी सीसीटीव्ही फुटेजद्वारे नजर ठेवण्यात येणार असून, शांतता कमिटी, दक्षता कमिटी, ज्येष्ठ नागरिक, निवृत्त पोलिस अधिकारी यांची मदत घेण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे चौकीपातळीवर बैठकांचे आयोजन करून, संवेदनशील ठिकाणी बंदोबस्त ठेवण्यात येणार असल्याची माहितीही सरदेशपांडे यांनी दिली.

पुण्यनगरी – दि.२२ नोव्हेंबर, २०१९

# वृद्धांना सांभाळणारे उमेद केअर देवदूतच

## ❑ सहायक पोलीस उपायुक्त मच्छिंद्र चव्हाण



■ पुणे : प्रतिनिधी

ज्या आईवडिलांनी आयुष्यभर खस्ता खाऊन मुलांना विदेशात पाठवले, ती मुले आई-वडिलांना अखेरच्या काळात विचारत नाहीत. त्यांना आपल्या पालकांसाठी द्यायला वेळ नाही. उमेद केअर

अशा ज्येष्ठ नागरिकांचा अखेरपर्यंत सांभाळ करते. पीडित, आजारी व अंथरुणाला खिळलेल्या रुग्णांची सेवा करते, म्हणूनच उमेदचे कार्य हे देवाचे कार्य आहे, असे मत सहायक पोलीस उपायुक्त मच्छिंद्र चव्हाण यांनी व्यक्त केले.

कात्रज येथील उमेद केअर सेंटर या वृद्धाश्रमातील वृद्ध रुग्णांच्या मदतीसाठी बालगंधर्व रंगमंदिर येथे 'वऱ्हाड आलंय लंडनहून...! या विनोदी नाटकाच्या रौप्यमहोत्सवी प्रयोगाचे आयोजन केले होते. यावेळी नाटकाचे लेखक दिग्दर्शक अमोल खापरे यांनी नाटकाच्या प्रयोगातून मिळालेल्या उत्पन्नाचा धनादेश उमेद केअर सेंटरच्या संस्थापिका डॉ. रंजना कदम-पोवार यांच्याकडे सुपूर्द केला.

याप्रसंगी अभिनव एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष राजीव जगताप, गरवारे महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. सुजाता काळे, नगरसेवक युवराज बेलदरे, उमेद केअर सेंटरचे संचालक विठ्ठलराव वरुडे-पाटील, विशाल वरुडे-पाटील उपस्थित होते. यावेळी नाटकातील सर्व कलाकार आणि सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व पत्रकारिता क्षेत्रामध्ये उत्तम कामगिरी करणाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यामध्ये नाटकाचे दिग्दर्शक अमोल खापरे, वरिष्ठ पोलीस अधिकारी वसंत कुंवर, घाटे समूहाचे संचालक फुलचंद घाटे, उद्योगपती मधुकर सुरवसे, उद्योगपती विकास मुंदडा, युवा संवाद चॅनेलचे धनराज गरड, दूरदर्शन पुणेचे नारायण ढेबे, सचिन कोळी, पत्रकार पांडुरंग मरगजे, शाहीर समीर पासलकर, अक्कलकोटचे उपनगराध्यक्ष मधुकर जाधव, मंडल अधिकारी शेखर शिंदे, प्रगती फाउंडेशनचे अध्यक्ष प्रतीक कदम, मंडल अधिकारी सूर्यकांत पाटील आणि सिद्धिविनायक ग्रुप कात्रजचे अमोल ठाकरे आणि सहकारी यांचा सत्कार करण्यात आला.

डॉ. रंजना कदम पोवार म्हणाल्या, पाल्यांची इच्छा असूनही घरी सांभाळू शकत नसलेल्या आजी-आजोबांसाठी काहीतरी वेगळे केले पाहिजे, या भावनेने २००० मध्ये आम्ही उमेद केअर सेंटरची स्थापना केली. उमेद केअरच्या माध्यमातून आम्ही १० ते १२ नर्सिंग युनिट सुरू केले असून, या माध्यमातून अनाथाश्रमातील ४५ मुलींना शिक्षण, त्यांचे पुनर्वसन, तसेच त्यांचे लग्न जमवून कन्यादानही केले, असे त्यांनी सांगितले.

पुण्यनगरी – दि. १९ नोव्हेंबर, २०१९

# डॉक्टर-पोलिसांचे समाजाशी जवळचे नाते : जाधव

पुणे : प्रतिनिधी

पोलीस आणि डॉक्टर यांचे समाजाशी अत्यंत जवळचे नाते आहे. डॉक्टर अपघातग्रस्त आणि आजारी रुग्णांवर उपचार करून त्यांना बरे करतात, तर पोलीस समाजातील गुंडांवर वचक बसवून समाजामध्ये शांतता राखण्यासाठी चोवीस तास काम करीत असतात. अपघात झाल्यानंतर पोलीस तातडीने घटनास्थळी जाऊन अपघातग्रस्तांना रुग्णालयात पाठवितात आणि जमावाला शांत करण्यासाठी मदत करतात, असे मत हडपसर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव यांनी व्यक्त केले.



हडपसरमधील सह्याद्री हॉस्पिटलच्या वतीने हडपसर पोलीस स्टेशनमधील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या उंची, वजन, बीएमआय मोजणी, आहारविषयक मार्गदर्शन, ईसीजी, छातीचा एक्स-रे, पीएफटी, स्ट्रेस टेस्ट, रँडम शुग्र, हिमोग्राम, २डी-इको आदी तपासण्या करून मार्गदर्शन करण्यात आले.

याप्रसंगी हडपसर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक हमराज कुंभार, हॉस्पिटलचे सीईओ डॉ. सुनील राव, डॉ. अमृता वैद्य, आशा वासवाणी आणि पोलीस अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

डॉ. राव म्हणाले की, पोलीस चोवीस तास सेवा करीत असतात. मात्र, समाजसेवा करीत असताना पोलीस स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात आणि त्यांना विविध आजारांना सामोरे जावे लागत आहे, ही बाब दुर्दैवी आहे. सामान्य नागरिकांपासून प्रत्येकाने आरोग्य सुदृढ राखण्यासाठी दरवर्षी अरोग्य तपासणी करून घेणे गरजेचे काळाची गरज आहे, असे त्यांनी सांगितले.

लायझनिंग वरिष्ठ व्यवस्थापकचे विजय गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले.

# व्यापाऱ्यांनी अधिक सतर्क राहण्याची गरज

## अशोक कदम : दरोड्याच्या पार्श्वभूमीवर वारज्यात सराफांची बैठक

लोकमत न्यूज नेटवर्क

वारजे : रविवारी कोथरूड येथील पौड रस्त्यावर पिस्तुलाचा धाक दाखवत सराफी दुकानावरील पडलेल्या सशस्त्र दरोड्याच्या पार्श्वभूमीवर वारजे व कर्वेनगरमधील सराफी व्यापाऱ्यांनी अधिक चौकस होऊन अशा घटना टाळण्यासाठी खबरदारी घेण्याबाबत सूचना करण्यात आल्या. याबाबत वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात सोमवारी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कदम यांनी उपस्थित सराफी व्यावसायिकांना सूचना दिल्या. यात उच्च दर्जाचे सीसीटीव्ही बसवणे, त्यात मुख्य प्रवेशद्वाराबरोबरच दुकानाच्या आतील, तसेच बाहेरील रस्त्यावरील भाग कव्हर होईल याची काळजी घेणे, सुरक्षारक्षक नेमणे, सर्व कामगारांची त्वरित पोलीस पडताळणी करून घेणे आदी सूचना होत्या.

या वेळी काही दुकानदारांनी



वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात सराफ असोसिएशनच्या बैठकीत बोलताना निरीक्षक अशोक कदम.

### 'लोकमत'च्या वृत्तांकनाचा सन्मान

- आजच्या 'लोकमत'च्या अंकात पुणे पोलीस सर्वांत जास्त लोकाभिमुख असल्याबद्दल वृत्ताची दखल या कार्यक्रमात घेण्यात आली. यात उपस्थित सर्व व्यापाऱ्यांनी व पोलिसांनी 'लोकमत'च्या या उपक्रमाची प्रशंसा करत स्थानिक वार्ताहर यांचे अभिनंदन केले.

सीसीटीव्हीचा व सुरक्षारक्षकाचा खर्च जास्त येतो. त्यामुळे यात नगरसेवकांनी

पालिकेच्या मार्फत हातभार लावावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. या वेळी पुणे सराफ असोसिएशनचे अध्यक्ष प्रदीप मैड, दहियाल शहाणे, वरिष्ठ निरीक्षक कदम, नितीन थोथे, अशोक येवले, सोनाली कतले, कर्मचारी संतोष भापकर व इतर उपस्थित होते.

महाराष्ट्र टाइम्स – दि. २० नोव्हेंबर, २०१९

# ‘लिव्ह इन’ची वरात; लग्नाच्या घरात

Shrikrishna.Kolhe
@timesgroup.com
Tweet : ShrikrishnaMT

## पोलिसांच्या मध्यस्थीने १८ वर्षांनंतर विवाह

मटा विशेष



> भरोसा सेलकडे ‘लिव्ह इन’संदर्भातील तीन केस आल्या होत्या. त्यामध्ये त्या जोडप्यांचे विवाह लावून देण्यात आले आहेत. त्यांचे संसार सुरळीत सुरू आहेत.
>
> – विजया कारंडे, वरिष्ठ निरीक्षक, भरोसा सेल

पुणे : प्रेम जुळले, तरी वेगवेगळ्या धर्मांचे असल्याने विरोधाच्या भीतीने विवाह न करता ते दोघे ‘लिव्ह इन’ मध्ये राहू लागले. तब्बल १८ वर्षे ते सोबत राहिले. त्यांना १६ वर्षांचा मुलगाही आहे. मुलाच्या भविष्याची काळजी वाटू लागल्याने महिलेने विवाह करण्याचा आग्रह धरला. मात्र, त्याने ते टाळल्याने दोघांमध्ये वाद झाले. अखेर तिने पोलिसांच्या भरोसा सेलकडे धाव घेतली. पोलिसांनी समुपदेशन केल्यानंतर तब्बल १८ वर्षांनी ते विवाहबद्ध झाले आणि ‘लिव्ह इन’ची ही वरात अखेर लग्नाच्या घरापर्यंत पोहोचली.

कॅम्प परिसरात एक जोडपे गेल्या १८ वर्षांपासून ‘लिव्ह इन’मध्ये राहत होते. तो एका खासगी कंपनीत नोकरी करतो. तर, ती गृहिणी आहे. पूर्वी जवळ राहत असल्यामुळे त्यांची ओळख झाली आणि प्रेम जुळले. वेगवेगळ्या धर्मांचे असल्यामुळे विवाहास विरोध होऊ शकतो, या भीतीने त्यांनी विवाह केला नाही. त्यांना आता १६ वर्षांचा एक मुलगा आहे. तिला मुलाच्या भविष्याची काळजी वाटू लागली आणि त्याला वडिलांचे नाव लावण्यात अडचण येईल, असाही प्रश्न पडला. अखेर आपण लग्न करू, असा आग्रह त्याच्याकडे धरला. पण ‘इतकी वर्षे विवाह केला नाही, आता काय गरज आहे,’ असे म्हणत त्याने विवाहाच्या विषयावर टाळाटाळ केली. त्यामुळे त्यांच्यात वादही झाले. अखेर तिने पोलिसांच्या भरोसा सेलकडे धाव घेऊन सर्व प्रकार सांगितला. त्यानंतर दोघांनाही एकत्र बसवून समुपदेशन केल्यानंतर दोघांचा विवाहोत्तर संसार पुन्हा सुरू झाला.

‘लिव्ह इन’मध्ये राहिलेल्या दाम्पत्याच्या संसारातील असे विषय हल्ली पोलिसांच्या भरोसा सेलकडे येऊ लागले आहेत. पुणे पोलिस आयुक्तालयातील भरोसा सेलमध्ये वेगवेगळ्या स्वरूपाच्या तक्रारी घेऊन महिला येतात. त्या सोडविण्याचे काम पोलिसांकडून केले जाते. गेल्या काही महिन्यात भरोसा सेलकडे अनेक वर्षे लिव्ह इनमध्ये राहिलेल्या महिलांच्या तक्रारी आल्या होत्या. त्यामध्ये विवाह करण्यासाठी सोबत राहणारा पुरुष तयार होत नसल्याची तक्रारी प्रामुख्याने करण्यात आल्या होत्या. ‘लिव्ह इन’मध्ये राहणाऱ्या जोडप्यांना मुलेदेखील आहेत. मुलांच्या भविष्याच्या चिंतेसाठीच त्या महिला विवाहासाठी आग्रह धरत आहेत. अशा तक्रारीनंतर भरोसा सेलमध्ये दोघांना समोरा-समोर बसवून त्यांच्या अडचणी समजावून घेण्यात आल्या. त्यांचे समुपदेशन करून त्यांना काही गोष्टी समजावून सांगण्यात आल्या. त्यानुसार ‘लिव्ह इन’मध्ये राहणाऱ्या तीन जोडप्यांनी विवाह केले आहेत. यामध्ये एक जोडपे १२ वर्षे, दुसरे १४ आणि तिसरे १८ वर्षे ‘लिव्ह इन’मध्ये राहत होते. भरोसा सेलच्या प्रयत्नामुळे या जोडप्यांनी विवाह केले असून, त्यांचे संसार सुखाने सुरू आहेत, अशी माहिती भरोसा सेलच्या महिला सहायता कक्षाच्या प्रमुख विजया कारंडे यांनी दिली.

दोघे वेगवेगळ्या धर्मांतील असल्यामुळे दोघांच्या कुटुंबातील व्यक्तींचा विवाहाला विरोध असतो. त्यामुळे ते अनेक वर्षे ‘लिव्ह इन’मध्ये राहतात. पण, नंतर महिलेला तिच्या बरोबरच मुलाच्या भविष्याची चिंता लागून राहते. आपले आयुष्य तर असेच गेले. आता मुलाला तरी हक्क मिळायला हवा म्हणून काही महिला अनेक वर्षे ‘लिव्ह इन’मध्ये राहिल्यानंतर विवाहासाठी पुरुषांकडे आग्रह धरत असल्याचे दिसून आले आहे,’ असे भरोसा सेलच्या वरिष्ठ निरीक्षक विजया कारंडे यांनी सांगितले.

पुढारी – दि. ७ नोव्हेंबर, २०१९




**महाबँकेतर्फे आयोजित सतर्कता सप्ताहामध्ये उपस्थित कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पुणे शहर पोलिसचे अतिरिक्त आयुक्त अशोक मोराळे, बँकेचे एमडी ए. एस. राजीव, ईडी ए. सी. राऊत, मुख्य सतर्कता अधिकारी एल. एन. रथ.**

# ‘महाबँके’तर्फे सतर्कता सप्ताह

**पुणे :** गेल्या आठवड्यात बँक ऑफ महाराष्ट्रतर्फे चालवण्यात आलेल्या सतर्कता सप्ताहाची सांगता नुकतीच झाली. बँकेच्या मुख्य कार्यालयात संपन्न झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी शहर पोलिसचे अतिरिक्त आयुक्त अशोक मोराळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमास बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी ए. एस. राजीव, कार्यकारी संचालक ए. सी. राऊत आणि मुख्य सतर्कता अधिकारी एल. एन. रथ यांचीही विशेष उपस्थिती होती.

प्रामाणिकपणा - एक जीवनशैली ही या सप्ताहामागची मूळ संकल्पना होती. माणसाचे आयुष्य प्रामाणिकपणावर आधारलेले असावे असे अशोक मोराळे यांनी सांगितले. बँकेचे ए. एस. राजीव म्हणाले की, प्रत्येक कर्मचाऱ्याने प्रामाणिकपणा आणि सचोटीच्या जोरावर बँकेतील भ्रष्टाचाराविरोधात एकजुटीने उभे राहिले पाहिजे. त्यादृष्टीने सतर्कता जागरुकता सप्ताह आयोजनाची आवश्यकता असल्याचेही त्यांनी सांगितले. दरम्यान, या सप्ताहामध्ये देशभरातील ३२ विभागीय शाखांमध्ये विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

लोकसत्ता – दि. १६ नोव्हेंबर, २०१९

## ५८ महाविद्यालयांतील १३ हजार युवकांचे समुपदेशन

# महाविद्यालयीन युवकांना वाहतूक नियमांबाबत पोलिसांकडून धडे!

**प्रतिनिधी, पुणे**

**रस्ते सुरक्षेबाबत** वाहतूक पोलिसांकडून सुरू करण्यात आलेल्या जनजागृती कार्यक्रमात गेल्या चार महिन्यात ५८ महाविद्यालयातील १३ हजार युवकांना वाहतूक नियमांचे धडे देण्यात आले. यापुढील काळात वाहतूक पोलिसांकडून महाविद्यालयीन पातळीवर जनजागृती कार्यक्रमाच्या माध्यमातून समुपदेशन कार्यक्रम सुरू ठेवण्यात येणार आहे.

वाहतूक नियम पाळणे, अपघातग्रस्तांना मदत, स्वयंशिस्त याबाबत वाहतूक पोलिसांकडून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येत आहे. बेजबाबदारपणे वाहन चालविल्यामुळे गंभीर स्वरुपाचे अपघात घडतात. कारवाई करुन अपघातांचे प्रमाण कमी करणे शक्य नाही. समुपदेशनाच्या माध्यमातून अधिकाधिक नागरिक तसेच महाविद्यालयीन युवकांना वाहतुकीच्या नियमांबाबत माहिती दिल्यास अपघातांची संख्या कमी होईल, या विचारातून वाहतूक पोलिसांनी प्रयत्न सुरू केले आहेत. जुलै २०१९ पासून वाहतूक पोलिसांच्या समुपदेशन कक्षाच्या माध्यमातून शहर परिसरातील महाविद्यालयांमध्ये समुपदेशन कार्यक्रम राबवून विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्यात येत आहे.



> महाविद्यालयीन युवकांना रस्ता सुरक्षा तसेच वाहतुकीच्या नियमांचे महत्त्व पटवून देण्याचे काम करण्यात येत आहे. महाविद्यालयीन प्रशासनाने पोलिसांना चांगले सहकार्य केले आहे. या पुढील काळात समुपदेशन कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.
>
> – **राजेश पुराणिक,**
> वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाहतूक विभाग.

वाहतूक पोलिसांनी आतापर्यंत मॉडर्न, फर्ग्युसन, स. प. महाविद्यालय, मराठवाडा मित्र मंडळाच्या महाविद्यालयासह शहरातील अन्य प्रमुख महाविद्यालयांमध्ये समुपदेशन कार्यक्रम राबविले आहेत. या कार्यक्रमात वैद्यकीय तज्ज्ञ, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधीही सहभागी होतात. जुलै ते ऑगस्ट या चार महिन्यांच्या कालावधीत वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त पंकज देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश पुराणिक आणि कर्मचारी विविध महाविद्यालयात जाऊन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

# अभिप्राय...

"अभिप्राय"

नाव :- नितीन [illegible] पो.शि. [illegible]
नेम. भारती विद्यापीठ पो. ठाणे पुणे शहर

विषय :- दर्पण पुस्तिकाबाबत अभिप्राय......

महोदय,

[illegible]

[illegible]

[illegible]

(पो.शि. [illegible])
भा. वि. पो. ठाणे, पुणे शहर

---

प्रति,

मा. वरीष्ठ पोलीस निरीक्षक सो.
सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे शहर
यांना सविनय सादर,

प्रतिवेदक :- पी.एस.धांडे, महिला पोलीस शिपाई ७९१७, सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे

विषय :- दर्पन पुस्तकासंदर्भात अभिप्रायबाबत.

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, मा. पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांनी पोलीस आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीची माहिती नागरिकांना समजावी या उद्देशाने पोलीस ठाणे येथे दैनंदिनी कामकाज करीत असताना झालेल्या चांगल्या कामगिरीबाबतची प्रेसनोट जनसंपर्क अधिकारी पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर यांचे कार्यालयात सादर करणेबाबत दिलेल्या आदेशाप्रमाणे पोलीस ठाणे येथे आठवडाभरामध्ये झालेल्या चांगल्या कामगिरीची प्रेसनोट सादर करण्यात येत असुन सदरची प्रेस नोट वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यानंतर सदरचे पेपर कात्रनाची कटिंग करुन त्या पासुन दर्पन हे पुस्तक तयार करण्यात आले आहे. सदरचे पुस्तक हे ठाणे अमंलदार कक्षामध्ये ठेवण्यात येत असुन पोलीस ठाणे येथे येणारे नागरिकांना सदरचे पुस्तक वाचण्यासाठी देण्यात येत असते.

दर्पन या पुस्तकामुळे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीची माहिती एकत्रीतपणे वाचण्यासाठी मिळत असल्याने त्याबाबत समाधान व्यक्त करुन पोलीसांचे कौतुक करण्यात येत आहे.

मा. सादर व्हावे,
दि. १८/०६/२०१९

( पी.एस.धांडे )
महिला पोलीस शिपाई ७९१७
सिंहगडरोड पोलीस ठाणे पुणे शहर.



वेश्या व्यवसायप्रकरणी तिघांना अटक
Cyber crime cell arrests fake IAS officer
दुचाकी चोरीप्रकरणी दोघांना अटक
सारसबाग परिसरात लुटणारे अटकेत
कोयता बाळगणाऱ्या तडीपाराला अटक
नंबर प्लेट बदलून वापरणाऱ्यास अटक
प्रवाशाला लुटणाऱ्या रिक्षाचालकासह तिघे अटक
गांजाची विक्री करणारा अटकेत
Crime Branch busts gang using stolen trucks in MP mines, 1 held
Viman Nagar: 2 arrested with elephant tusks
तरुणीला अश्लील व्हिडीओ पाठविणाऱ्या तरुणाला अटक
मुलीचे अपहरण करणारा अटकेत
कोयते, हॉकी स्टिक बाळगणाऱ्यांना अटक
तरुणपणाच्या प्रेमाचं उतारवयात झळ
PROPERTY DISPUTE
3 held for 'threatening family at gunpoint'
महिलांचे शोषण करणाऱ्या भोंदूबाबाला अटक
चंदनाची झाडे चोरणाऱ्यास अटक
PROCURED MULTIPLE VEHICLE LOANS
3 held for cheating nine govt, private banks of Rs 59.5 lakh
सराईताला गावठी पिस्तुलासह अटक
पिस्तूल बाळगणाऱ्या सराईताला शुक्रवार पेठेत पकडले
रस्त्यावर पार्क केलेली दुचाकी चोरणाऱ्यास अटक
फरारी आरोपीला १२ वर्षांनंतर अटक
गंभीर मारहाणप्रकरणी दोघांना अटक
घरफोडीप्रकरणी दोघांच्या कोठडीत
City cops help tourist get back bag with valuables
सजग नागरिकांमुळे चार लाखांचा ऐवज परत
विद्यार्थ्यांनी घेतले वाहतूक नियमांचे
पोलिसांकडून पाण्याला मार्ग देण्यासाठी प्रयत्न...